CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# खरीप पिकविम्यापोटी शेतकऱ्यांना ४१.४५ कोटींचे वाटप

- ४२ हजार ७९७ शेतकऱ्यांना लाभ
- उत्पन्नावर आधारित नुकसान भरपाई

**तभा वृत्तसेवा । विकास चाटी**
**सोलापूर, दि.९ मे-**

खरीप हंगाम २०२५ मध्ये नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीपोटी जिल्ह्यातील नुकसानग्रस्त ४१ कोटी ४५ लाख ९१ हजार ४४३ रुपयांची मदत करण्यात आले. तब्बल ४२ हजार ७९७ शेतकऱ्यांना हा लाभ मिळाला आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले.

मुगाची सर्व भरपाई माढा तालुक्यातील २४८१ शेतकऱ्यांना मिळाली आहे. भुईमुगाचे पैसे बार्शी तालुक्यातील ६२२ शेतकऱ्यांना मिळून १ कोटी ८८ लाख ५१ हजार ६९७ रुपये मिळाले. मक्याचे सर्व पैसे माळशिरस तालुक्यातील १ हजार ४५७ शेतकऱ्यांना मिळाले. कांद्याचे पैसे पाच तालुक्यातील २० हजार ५६९ शेतकऱ्यांना मिळाले आहेत.

| एकूण नुकसानभरपाई | |
|---|---|
| कांदा | २९ कोटी ६६ लाख ११ हजार ८६८ |
| बाजरी | ५४ लाख ३० हजार १२४ |
| मुग | १ कोटी ३८ लाख १६ हजार ७५९ |
| भुईमुग | १ कोटी ९२ लाख १९ हजार ७५६ रुपये |
| तुर | ५ कोटी १७ लाख ४० हजार ९८९ |
| मका | २१ लाख ६७ हजार ४८० |
| सोयाबीन | २ कोटी ७७ लाख ७१ हजार ९४७ |

त्यात माढा तालुक्यातील ६४२७ शेतकऱ्यांना ९२ लाख ८१ हजार १४१ रुपये, माळशिरस तालुक्यातील १३०७ शेतकऱ्यांना ७१ लाख ६६ हजार ५६७ रुपये, मंगळवेढा तालुक्यातील ५६९४ शेतकऱ्यांना १७ कोटी ३४ लाख २५ हजार ६१३ रुपये, उत्तर सोलापूर तालुक्यातील २९०३ शेतकऱ्यांना ३ कोटी ३३ लाख ६ हजार १५८ रुपये, दक्षिण सोलापूर तालुक्यातील ४२३८ शेतकऱ्यांना ७ कोटी ३४ लाख ३२ हजार ३८९ रुपये मिळाले.

बाजरीचे पैसे करमाळा आणि माढा तालक्यातील शेतकऱ्यांना मिळाले. त्यात करमाळा तालुक्यातील ६३२ शेतकऱ्यांना २५ लाख ९४ हजार ६०५ रुपये तर माढा तालुक्यातील २५० शेतकऱ्यांना २८ लाख ३५ हजार ५१९ रुपये मिळाले. तुरीचे पैसे माढा, मंगळवेढा, मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळाले. माढा तालुक्यातील ४८४५ शेतकऱ्यांना ४ कोटी ४६ लाख ५७ हजार ९७० रुपयांची भरपाई मिळाली. मंगळवेढा तालुक्यातील ५७३९ शेतकऱ्यांना ६४ लाख ५ हजार ४८४ रुपयांची भरपाई मिळाली आहे. मोहोळ तालुक्यातील ५०८ शेतकऱ्यांना ६ लाख ७७ हजार ५३५ रुपयांची नुकसान भरपाई मिळाली.

विविध पिकांसाठी मिळालेल्या नुकसान भरपाईत अक्कलकोट तालुक्यातील ११६ शेतकऱ्यांना ३ लाख ६८ हजार ५९ रुपये, बार्शी तालुक्यातील ६२२ शेतकऱ्यांना १ कोटी ८८ लाख ५१ हजार ६९७ रुपये, करमाळा तालुक्यातील ६३२ शेतकऱ्यांना ५ लाख ९४ हजार ६०५ रुपये, माढा तालुक्यातील १४ हजार ३ शेतकऱ्यांना ५ कोटी ९१ हजार ३८९ रुपये, माळशिरस तालुक्यातील २७६४ शेतकऱ्यांना ७१ लाख ६६ हजार ५६७ रुपये, मंगळवेढा तालुक्यातील ११ हजार ४३३ शेतकऱ्यांना १७ कोटी ९८ लाख ३१ हजार ९७ रुपये, मोहोळ तालुक्यातील ६०८६ शेतकऱ्यांना २ कोटी ८४ लाख ४९ हजार ४८२ रुपये, उत्तर सोलापूर २९०३ शेतकऱ्यांना ३ कोटी ३३ लाख ६ हजार १५८ रुपये, दक्षिण सोलापूर तालुक्यातील ४२३८ शेतकऱ्यांना ७ कोटी ३४ लाख ३२ हजार ३८९ रुपयांची नुकसान भरपाई मिळाली आहे.






## चंद्रभागेत उडी मारून आत्महत्या करु पाहणाऱ्या वृध्दाचा जीव वाचवला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मे-**

चंद्रभागेच्या पात्रात उडी मारून आत्महत्या करु पाहणाऱ्या एका वृध्दाचा जीव कोळी तरुणांनी वाचवला. रघुनाथ कोरडे (वय-७६, रा.हिंगणी, ता.तेलारा,जि.अकोला) असे त्या वृध्दाचे नाव आहे.

आयुष्याचा कंटाळा आल्याने विठ्ठलास जीव समर्पित करण्याच्या भावनेनं आत्महत्या करत असल्याचे त्या वृध्दाने सांगितले.विठ्ठल अधटराव, महेश परचंडे, सुहास साळुंखे, साहिल माने, संकेत कोरे, गणेश कोळी यांनी सदर वृध्दाचा जीव वाचवला. आपत्कालीन व्यवस्थापनसाठी रेस्क्यू टीम नेमून त्यात कोळी समाजातील तरुणांना समाविष्ट करण्यात यावी, अशी मागणी महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केली.

## 'नागनाथ'चे माजी विद्यार्थी ३४ वर्षांनी आले एकत्र

**अक्कलकोट दि ९ मे-**

तालुक्यातील नागनाथ प्रशाला कुरनूर येथील १९९१-९२ च्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल ३४ वर्षांनी स्नेह मेळावा पार पडला.

माजी विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक व निवृत्त शिक्षकांचे स्वागत केले. देवी सरस्वती प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक महादेव माने यांनी केले. मुख्याहरिदास जाजनुरे, शरणप्पा ढोणसाले, परशुराम बेडगे, मदार शेख, सुरेश माने, स्वामी सुरवसे, किसन कांबळे, शहाजी गायकवाड आदी निवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान झाला. निवृत्त शिक्षकांनी मार्गदर्शन केले. आबा कुरनूरकर, कार्तिक पाटील, उस्मान मुजावर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.दुपारी विद्यार्थी व शिक्षकांनी स्नेहभोजन केले. यावेळी राजेंद्र मोरे, मेजर राम चंद्र शिंदे, भास्कर मोरे, मधुकर बनसोडे, विठ्ठल सपकाळ, महादेव पाटील, बाबासाहेब शिंदे, गणेश पाटील, हेमंत पवार, पोपट गायकवाड, तानाजी मोरे, मीनाक्षी मोरे, अनुराधा शिंदे, चिमु इंडे, बेबा साखरे, हिरालाल मुजावर, विकास येवते, गोविंद पाटील, राजकुमार पाटील, रफिक शेख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन दिगंबर जगताप तर कार्तिक पाटील यांनी आभार मानले.



## 'खेडभाळवणी'तील मेळाव्यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मे-**

एकता महिला मंचतर्फे पंढरपूर तालुक्यातील खेडभाळवणी येथे विशेष मार्गदर्शन मेळावा, सन्मान सोहळा आणि महिला स्पर्धांचा सोहळा अत्यंत उत्साहात झाला. पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक रेखा घनवट, निर्भया पथकाच्या प्रमुख सुप्रिया यादव यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी प्रभाकर क्षीरसागर, शाहीद सय्यद, सुमित टकले, अनुराधा हडपद, मीनाक्षी साळुंखे, प्रियंका दामोदरे, सुरेखा साळुंखे, भामा चंदनशिवे आदी उपस्थित होते. प्रियंका दामोदरे यांनी सूत्रसंचालन, मीनाक्षी साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. भामा चंदनशिवे यांनी आभार मानले.

प्रत्येक स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकांच्या विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे मलबार गोल्ड अँड डायमंड सोलापूर यांच्यातर्फे काढलेला 'लकी ड्रॉ'. यामध्ये तीन भाग्यवान महिला विजेत्यांना मलबार गोल्डतर्फे विशेष आकर्षक भेटवस्तू दिल्या.

## अज्ञात पिकअपने कट मारल्याने कारची एसटी बसला जोरदार धडक

- एकाच कुटुंबातील तिघे जखमी
- लहान मुलगा थोडक्यात बचावला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.९ मे-**

बार्शी-कुर्डूवाडी रोडवरील खांडवी परिसरात शुक्रवारी पहाटे भीषण अपघात झाला. अज्ञात पिकअप चालकाने मारलेल्या कटमुळे कार अनियंत्रित होऊन समोरुन येणाऱ्या एसटी बसला धडकली. या अपघातात एकाच कुटुंबातील तिघेजण जखमी झाले असून, सुदैवाने एक लहान मुलगा थोडक्यात बचावला आहे.

पुणे येथील ढोले वस्ती (कुरळी) परिसरात राहणारे हॉटेल व्यावसायिक विनोद शशिकांत शिंदे (वय-३७) हे आपल्या कुटुंबासह कारने (क्र. १४/०९६२) पुण्याहून मूळ गावी कोथळा (ता.कळंब, जि.धाराशिव) येथे जात होते. शुक्रवार, दि. ८ मे रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास त्यांची कार बार्शी-कुर्डूवाडी रोडवरील खांडवी परिसरातील लकी हॉटेलजवळ




आली. समोरुन बार्शी-कोल्हापूर एसटी बस (क्र.१४/५०६२) येत होती. बसला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका अज्ञात पिकअप चालकाने शिंदे यांच्या कारच्या चालक बाजूच्या टायरला जोरदार कट मारला. या धडकेमुळे कारच्या पुढील टायरमधील हवा निघून टायर फुटले आणि चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. अनियंत्रित झालेली कार थेट समोरुन येणाऱ्या एसटी बसवर जाऊन आदळली. अपघातानंतर एसटी बसचे चालक, वाहक आणि प्रवाशांनी तात्काळ मदतकार्य सुरु करत कारमधील जखमींना बाहेर काढले. शिंदे यांच्या कारच्या मागून येणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांच्या दुसऱ्या वाहनातील लोकांनी जखमींना तातडीने बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल केले. या अपघातात विनोद शशिकांत शिंदे (वय-३७) यांचा उजवा पाय मोडून गंभीर दुखापत झाली आहे. कोमल विनोद शिंदे (वय-३२) आणि भक्ती विनोद शिंदे (वय-१२) यांना किरकोळ मार लागला आहे. कैवल्य हा मुलगा या अपघातातून सुखरुप बचावला. जखमींवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली. अपघात घडवून पिकअप चालक घटनास्थळावरुन फरार झाला असून, याप्रकरणी विनोद शिंदे यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## बार्शीत हिट अँड रनची घटना; उत्तर प्रदेशातील युवकाचा मृत्यू

**बार्शी दि.९ मे-**

बार्शी शहरातील गाडेगांव रोड परिसरात एका अज्ञात वाहनाच्या धडकेत उत्तर प्रदेशातील २१ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अपघातानंतर संबंधित वाहन चालकाने जखमी युवकाला कोणतीही मदत न करता घटनास्थळावरुन पलायन केल्याने हिट अँड रनची ही घटना चर्चेचा विषय ठरत आहे.

नरीज रामकसिन गौतम (वय २२, मूळ रा. जौरासा, ता. हैदरगड, जि. बाराबंकी, उत्तर प्रदेश) हे आपल्या चुलत भावासह बार्शी येथे वास्तव्यास असून मूर्ती कारागीर म्हणून काम करतात. गेल्या नऊ महिन्यांपासून ते गाडेगाव रोड परिसरातील अँपल हॉटेलच्या मागे राहून उत्तरेश्वर भगवान कांबळे यांच्याकडे मूर्ती बनविण्याचे काम करुन उदरनिर्वाह करत होते. गुरुवार दि. ८ मे रोजी रात्री ९.३० च्या सुमारास नरीज यांचा चुलत भाऊ सुरज रामकिशोर गौतम हा मालकांची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र. २५ २७५६) घेऊन किराणा सामान आणण्यासाठी गाडेगाव रोड परिसरात गेला होता. मालक उत्तरेश्वर कांबळे यांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधला. त्यावेळी एका अनोळखी व्यक्तीने फोन उचलून प्यासा हॉटेलजवळ अपघात झाल्याची माहिती दिली. यानंतर नरीज गौतम व उत्तरेश्वर कांबळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या सुरजला खाजगी रुग्णवाहिकेतून बार्शी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करुन रात्री १०.३५ वाजता त्याला मृत घोषित केले. नातेवाईकांनी परिसरातील लोकांकडे चौकशी केली असता, सुरजच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याचे समोर आले. अपघातानंतर वाहन चालकाने जखमीला वैद्यकीय मदत न करता तसेच पोलिसांना माहिती न देता घटनास्थळावरुन पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

**मदत न करता अज्ञात वाहन चालक फरार**

## खोट्या 'एमआरपी'द्वारे ग्राहकांची प्रचंड लूट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मे-**

वस्तुंवर छापलेल्या अवाजवी एमआरपी किंमतीद्वारे सुरू असलेली ग्राहकांची लूट थांबवा यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने देशव्यापी आंदोलन सुरु केल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

ग्राहकांना योग्य दरात वस्तू व सेवा मिळाव्यात म्हणून वस्तुची किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापण्याचे शासनाने बंधनकारक केले. मात्र याचा गैरफायदा घेत अवाजवी एमआरपी छापून ग्राहकांची लूट चालू आहे. ग्राहकांची लूट थांबवण्यासाठी मागील दोन वर्षापासून ग्राहक पंचायत विविध पातळीवर प्रयत्न करीत आहे. शासनाकडून अद्यापही योग्य प्रतिसाद मिळाला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचे पंचायतीने ठरविले आहे. त्याचाच एक भाग म्हणून १ मे ते २० मे दरम्यान देशभरातील ग्राहकांकडून अवाजवी एमआरपी विरुद्ध पंतप्रधान, अर्थमंत्री, वाणिज्य मंत्री, उद्योग मंत्री, ग्राहक संरक्षण मंत्री यांना लाखो ईमेल पाठविण्यात येत आहेत.

**'जंतरमंतर'वर २५ मे रोजी आंदोलन**

सोमवार, दि.२५ मे रोजी नवी दिल्ली येथील जंतरमंतरवर सत्याग्रह आंदोलनासाठी देशभरातून कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. आंदोलनात https://tinyurl.com/StopMRPLoot या लिंकद्वारे ईमेल करून जास्तीत जास्त ग्राहकांनी सहभागी व्हावे असे आवाहन ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, प्रांत सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा कोषाध्यक्ष ललिता वांगडे, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, सहसचिव दीपक भंडारकवठेकर यांनी केले आहे.

## राजकारण व अधिकाऱ्यांच्या दबावतंत्राचा शेतकऱ्यांना फटका

### मंद्रुप येथील शेंडगे वस्तीच्या रस्त्याला स्थगिती

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.९ मे -**

ठेकेदारांना कार्यारंभ आदेश देऊन एका महिन्यानंतर दुसऱ्या ठेकेदारांनी तक्रार केल्यामुळे अनेक दिवसांपासून वादात सापडलेल्या शेंडगे वस्ती रस्त्याचे काम बंद ठेवण्याचे आदेश बांधकाम उपअभियंत्यांनी दिले आहेत. त्यामुळे मंद्रूपमधील शेंडगे वस्तीच्या शेतकऱ्यांना पुन्हा राजकीय गटबाजी व ठेकेदारांच्या वादाचा फटका बसला आहे.

राजकारणापेक्षा आम्हाला हक्काचा रस्ता करून द्या, अशी विनंती शेतकरी करीत आहेत. अनेक वर्षांपासून शेंडगे वस्तीच्या रस्त्याचा विषय प्रलंबित आहे. यासाठी शेतकऱ्यांनी आमदारांची भेट घेऊन निधीची मागणी केली. त्यानंतर जनसुविधांतर्गत लोकसेवा शाळेपासून शेंडगे वस्तीपर्यंत २० लाख रूपयांचा निधी



मंजूर झाला. ठेका मिळवण्यासाठी भुरीकवठे येथील आशीर्वाद मजूर संस्था व माळकवठे येथील अमोगसिध्द मजूर संस्था यांच्यात स्पर्धा होती. ६ एप्रिलला माळकवठे येथील मजूर संस्थेला कार्यारंभ आदेश दिला. त्यांनी कामास सुरूवात केली.

मात्र भुरीकवठे येथील संस्थेने रस्त्याच्या कामाबद्दल तक्रार केल्यानंतर दक्षिणच्या गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी सुनावणी घेऊन ठेकेदारांमधील वाद मिटविण्याचे आदेश दिले. ठेकेदारांच्या वादात विकास निधी परत जाऊ नये, याची दक्षता घेण्याची सूचना केली. त्यानुसार दक्षिण पंचायत समिती बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांनी ठेकेदारांमधील वाद मिटेपर्यंत काम बंद ठेवण्याचे आदेश दिले.

एकीकडे दक्षिणच्या बांधकाम विभागाकडून कार्यारंभ मिळाल्यानंतर सहा महिन्यात काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. तर दुसरीकडे तक्रारीमुळे एक महिना काम सुरू झाले नाही. शिवाय महिन्यानंतर पावसाळा सुरू होणार आहे. त्यामुळे ठेकेदाराला मुदतवाढ मिळणार का ? असा सवाल उपस्थित होत आहे. दक्षिण पंचायत समितीकडे मंद्रूपमधील निकृष्ट कामाबद्दल अनेक तक्रारी असताना 'अर्थ'पूर्ण चर्चामुळे ती विकासकामे थांबविण्याचे आदेश देण्यात आले नाही. त्यामुळे कोट्यावधी रूपये पाण्यात गेली आहेत. याकडे अधिकारी गांभीर्याने न पाहता स्थानिक राजकारण व गटबाजीत हस्तक्षेप करीत शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या रस्त्याला जाणिवपूर्वक स्थगिती देऊन प्रशासनही राजकारण करीत असल्याची चर्चा सुरू आहे.

### २० लाख रुपये निधी परत जाण्याची शक्यता



शेंडगे वस्तीच्या रस्त्याच्या कामाचे कार्यारंभ दिले. मात्र भुरीकवठे येथील मजूर संस्थेच्या तक्रारीमुळे रस्त्याचे काम बंदचे आदेश दिले आहेत. दोन्ही ठेकेदारांनी तक्रार मिटवून घेतल्यानंतरच काम करण्याची सूचना दिली आहे. अन्यथा २० लाख रूपये निधी परत जाण्याची शक्यता आहे, असे दक्षिण सोलापूर तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांच्या त्रासाचा विचार करावा

शेंडगे वस्तीच्या रस्त्याचा विषय अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. शेतकऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे २० लाख निधी मिळाला, मात्र ठेकेदारांमधील वाद व अधिकाऱ्यांच्या दबावतंत्रामुळे रस्त्याचे काम बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. महिन्यानंतर पावसाळा सुरु होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होणार आहे. म्हणून अधिकाऱ्यांनी राजकारण न करता रस्ता करण्याचे आदेश द्यावेत, असे रेवणसिध्द शिंगडगाव या शेतकऱ्यांने सांगितले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE